**<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र ४६/२०११ मधील निशाणी ५६ वरील आदेश</u>**
(<u>दिनांक २५.०४.२०१६</u>)

०१. सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ७ ते १० विरुध्द झालेला उलट तपास नाही बाबतचा आदेश हा रद्दबातल करण्यात येवून प्रतिवादींना वादीचे साक्षीदारांचा उलट तपास घेणेची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. ७ ते १० च्या म्हणण्या प्रमाणे, वादी व प्रतिवादीची कथने विचारात घेवून दिनांक २३.०१.२०१३ रोजी वादाचे मुद्दे निशाणी ४१ खाली काढलेले असून मुद्दे काढले नंतर सुमारे दोन वर्षानी वादीने त्यांचे प्रथम साक्षीदाराचा जबाब हा दिनांक १९.०१.२०१५ रोजी नि. ४७ खाली नोंदविल्याचे अभिलेख पाहता निदर्शनास येते त्यानंतर दिनांक ९.१०.२०१५ रोजी नि. क्र. ४७ खाली साक्षीदार हजर जादा सरतपास नाही, पुकारले असता प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर राहीले, सबब उलट तपास नाही असा आदेश केलेला आहे.

०३. प्रतिवादी क्रमांक ७ ते १० यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ७ व ८ यांची जनक आई प्रतिवादी क्र. ९ ही वयोमानाने वारंवार आजारी असल्यामुळे त्यांना दवाखान्यात प्रतिवादी क्र. ७ यांना प्रतिवादी क्र. ९ चे सोबत बाहेरगावी जावे लागत असल्यामुळे तसेच प्रतिवादी क्र. ८ हा बॅकेत नोकरीवर असल्यामुळे त्यास रजेची उपलब्धी नसल्यामुळे प्रतिवादी क्र. १० ही लग्ना नंतर तिचे सासरी रहावयास असल्यामुळे प्रतिवादी क्र. ७ ते १० यांना त्यांचे विधीज्ञांना भेटून उलट तपासाचे दृष्टीने आवश्यक ती माहीती देता आलेली नाही, तसेच या कामातील प्रतिवादींचे विधीज्ञ बदलले गेल्यामुळे यापुर्वीचे वादीचे साक्षीदाराचा उलट तपास घेणे प्रतिवादींना स्वजबाबदारीवर जमलेले नाही.

०४. दिनांक ९.१०.२०१५ रोजी न्यायालयाने आदेश करते वेळी प्रतिवादी क्र. ७ ते १० हे वरील कारणास्तव न्यायालयात हजर राहू शकलेले नसल्यामुळे त्यांचे गैरहजेरीचा माफी होवून मिळणे व त्यांना वादीचे साक्षीदाराचा उलट तपास घेणेची संधी उपलब्ध करुन

देणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

०५. प्रतिवादी क्र. ७ ते १० यांना संधी नाकारली गेल्यास त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणारे आहे त्यामुळे गुणावगुणावरील अंतीम स्वरुपाचा न्यायनिर्णय होणेसाठी म्हणून प्रतिवादींचे विरुध्द झालेला उलट तपास नाहीचा आदेश हा रद्द बातल करण्यात येवून प्रतिवादी क्र. ७ ते १० यांना वादीचे साक्षीदाराचा उलट तपास घेण्याची संधी देण्या बाबत अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे.

०६. या अर्जास उजर घेत वादीने आपले सविस्तर म्हणणे निशाणी क्र. ५६ खाली मांडले. वादीच्या म्हणण्या प्रमाणे प्रतिवादींचा अर्ज हा खरा व कायदेशीर नाही. दावा हा चौकशीस लागले नंतर वादींनी निशाणी क्र. ४७ ला दिनांक १९.१.२०१५ रोजी सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. जवळ जवळ दहा महिने संधी देवून ही प्रतिवादींनी उलट तपासाची संधी घेतली नाही. त्यामुळे न्यायालयाने दिनांक ९.१०.२०१५ रोजी उलट तपास नाही असा हुकूम पारित केला आहे. त्यानंतर सुध्दा प्रतिवादींनी सुमारे चार महिन्या नंतर सदरचा अर्ज दिलेला आहे. यापुर्वी दावा मिळकतीचे मालकी हक्का संबंधी वादी व प्रतिवादी यांचे दिवाणी दावा झाला आहे. अर्जात नमूद केलेले कारण खोटे व बनावट असून त्या संबंधीचा कसला ही पुरावा अर्जा सोबत दिलेला नाही. वरील कारणास्तव अर्ज नामंजूर करणेस यावा अशी विनंती केली आहे.

०७. उभयंताच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत दावा हा कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्या प्रमाणे, प्रतिवादी क्र. ९ ही वयोमानापरत्वे वारंवार आजारी असल्यामुळे त्यांना त्यांचे दावाखान्याचे कामासाठी प्रतिवादी क्र ७ यांना प्रतिवादी क्र ९ चे सोबत जावे लागते त्यांनी आपल्या म्हणण्याच्या पृष्ठयार्थ नि. क्र ५९ व ६१ खाली गुजर रुग्णालय यांचे दिनांक ३.११.२०१४ व १७.१२.२०१४ आणि दिनांक २२.३. २०१६ रोजीचे वैदयकिय प्रमाण पत्र जोडले आहे. प्रतिवादींच्या म्हणण्या प्रमाणे त्यांचे विधीज्ञ बदलेले गेल्यामुळे वादीचे साक्षिदारांचा उलट तपास घेणे

जमले नाही. त्यामुळे त्याच्या विरुध्द प्रतिवादींनी उलट तपास नाही असा आदेश पारित करण्यात आला.

०८. प्रस्तूतचा दावा हा कब्जा मिळणेसाठी असल्यामुळे तसेच दावा गुणावगुणावर चालण्यासाठी आणि प्रतिवादींचे महत्वपुर्ण हक्क सदरच्या दाव्यात समाविष्ट असल्यामुळे प्रतिवादींना त्याचा उलट तपास घेण्याची पुर्ण संधी देणे न्यायोचित होईल. तसेच प्रत्येक व्यक्तिला त्याचा उलट तपास, बचाव किंवा पुरावा देणेसाठी पुरेशी संधी दिली पाहिजे असे नैसर्गिक न्यायदानाचे तत्व आहे. सदरचे तत्व हे प्रतिवादींच्या पक्षात आहे. प्रस्तूतचा दावा हा जुना आहे. प्रतिवादींने उलट तपास वेळेत न घेतल्यामुळे दाव्याचे काम लांबणीवर पडले आहे. म्हणून प्रतिवादींना आदेशित करण्यात येते की, वादीस कॉस्ट/खर्च म्हणून रु. २५०/— दयावे. या सर्व बाबीचा विचार करुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र. ७ ते १० यांनी वादीस कॉस्ट रु. २५०/— दिल्यानंतर प्रतिवादीचा उलट तपास नाही बाबतचा आदेश रद्द बातल करण्यात येतो.

०३. वरील आदेशा प्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येतो.

**(श्रीमती आर. आर. संकपाळ)**
दिनांक : २५/०४/२०१६ सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर,
सांगोला

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Smt. R.R. Sankpal<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 25.04.2016 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 25.04.2016 |